# बागलाण पंचायत समिती - सटाणा, जिल्हा नाशिक या संस्थेचा
# सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल

---

जा.क्र.स्था/३/ब/जिप/पंस/बागलाण/नाशिक/

उपमुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा, नाशिक
लेखा कोष भवन, तिसरा मजला,
जिल्हाधिकारी कार्यालयाचे आवार,
नाशिक :- २
दिनांक :-

**प्रेषक ,**

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक

**प्रति,**

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक

बागलाण पंचायत समिती, सटाणा जिल्हा नाशिक, या संस्थेचे सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षण श्री. सं. वा. पारनेरकर, सहाय्यक लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक २६.८.२००८ ते १६.९.२००८ या कालावधीत पूर्ण केले. या अहवालाचे पुनर्विलोकन श्री. सु. ध. ठाकरे, जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी (प्रभारी), स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक ३०.९.२००८ रोजी केले.

या अहवालावर चर्चा करुन अहवालाचे अंतिमीकरण श्री. वि. ए. कोते, उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक १६.१०.२००८ रोजी केले.

लेखा परिक्षीत आर्थिक वर्षामध्ये खालीलप्रमाणे पदाधिकारी व अधिकारी संस्थेचे कामकाज पहात होते.

**सभापती**

| | |
|---|---|
| सौ. अलका पंडीत माळी | १.४.२००७ ते ३१.३.२००८ |

**गटविकास अधिकारी (उ.श्रे.)**

| | |
|---|---|
| श्री. आर. एस. अहिरे (प्रभारी) | ३.३.२००६ ते ८.८.२००७ |
| श्री. आर. एस. अहिरे | ९.८.२००७ ते ३१.३.२००८ |

## भाग पहिला
## (मागील लेखापरीक्षण )

मागील लेखापरीक्षण अहवालातील खालील नमुद परिच्छेद थकीत असून त्याबाबत मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे स्वतंत्ररित्या पत्रव्यवहार सुरु आहे.

| अ. क्र. | वर्ष | परिच्छेद क्रमांक | एकूण परि. |
|---|---|---|---|
| १ | १९७३-७४ | ६ | १ |
| २ | १९७९-८० | ११ ( ब,क ) | १ |
| ३ | १९८०-८१ | ८,१२<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.८:- ब्राम्हणगांव व धांद्रीपाडा रस्ता दुरुस्ती बाबत.(६.१२)<br>परि.क्र.१२:-रोखवहीचा ताळेबंद .(६.१४९) | २ |
| ४ | १९८२-८३ | ३,५<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.३:-पंचायत समिती वाढीव उपकरातुन इंटरकॉम बसविण्याचा खर्च (६.५) | २ |
| ५ | १९८३-८४ | ४,६(१,२)<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.४:- कामांची मोजमापे न घेता रक्कम दिले बाबत.(६.२१)<br>परि.क्र.६:- केरसाणे शाळागृह बांधकामातील अनियमितता व विरगांव तळवाडे कामाची नस्ती मोजमाप पुस्तीका उपलब्ध नसले बाबत. (६.१२२) | २ |
| ६ | १९८४-८५ | १७<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.१७:- अपुर्ण बांधकामे (६.१३७) | १ |
| ७ | १९८५-८६ | २९<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.२९:- अपुर्ण बांधकामे (६.१७४) | १ |
| ८ | १९८६-८७-८८ | ६<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.६:- अल्पबचत अनुदानातुन कोरपड खरेदीचा नियमबाहय खर्च. (६.३६) | १ |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | १९८९-९० | ५,८,२४<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.२४:-अपुर्ण बांधकामाबाबत. (५.१६८) | ३ |
| १० | १९९०-९१ | ४,११<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.४:- कौले व ढापे खरेदीबाबत.(६.८)<br>परि.क्र.११:- अपुर्ण बांधकामाबाबत.(६.१७१) | २ |
| ११ | १९९१-९२ | १५<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.१५:- अपुर्ण बांधकामाबाबत.(६.१३७(६८) | १ |
| १२ | १९९२-९३ | १३<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.१३:- अपुर्ण बांधकामाबाबत. (६.१०६) | १ |
| १३ | १९९३-९४ | १० | १ |
| १४ | १९९५-९६ | १६(ब),४०<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.४०:- अपुर्ण बांधकामाबाबत.(४.११९(८) | २ |
| १५ | १९९६-९७ | ११,४४<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.४४:- अपुर्ण बांधकामाबाबत (४.४९(१६) | २ |
| १६ | १९९७-९८ | २५,२८<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.२५:- अनामत शिल्लक रक्कमेबाबत.(४.९४(९) | २ |
| १७ | १९९८-९९ | ११,१४,२३<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.११:- ग्रामपंचायत केळझर इंदिरा आवास घरकुलातील कामातील अफरातफर.(४.३)<br>परि.क्र.१४:- थकलेल्या आगाऊ रकमा (४.११२)<br>परि.क्र.२३:- अपुर्ण स्थितीतील बांधकामे (४.१०९(४७९) | ३ |
| १८ | १९९९-२००० | ३,७,९,११,१३<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.९:- हातपंप विद्युतपंप वर्गणी थकबाकीबाबत.४.१०८(१८)<br>परि.क्र.११:- थकीत अग्रीमबाबत.४.१०५(११)<br>परि.क्र.१३:- अपुर्ण बांधकामाबाबत.४.१०२(२०) | ५ |

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | २०००-२००१ | ३,६,८,१२,१४,१५(अ,ब)<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.१४ अपूर्ण बांधकामाबाबत४.१८२(२०)<br>परि.क्र.१५(अ,ब)- अग्रिम व अनामत रक्कमांबाबत.४.१८५(१४) | ६ |
| २० | २००१-२००२ | ८,९,१०,१८<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.८: हातपंप विदयुतपंप वर्गणी बाबत (४.२४९(९)<br>परि.क्र.९: जिल्हानिधी रोखवहीतील ताळमेळ पत्रकाबाबत(४.२४३(९)<br>परि.क्र.१०: थकीत अग्रीम रक्कमांबाबत (४.२५०(७) | ४ |
| २१ | २००२-०३ | ३,५,१०,१२,१४,१६,२०,२१,२४<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.२१:- थकीत अग्रीमाबाबत. | ९ |
| २२ | २००३-०४ | ५(२,३),८,११,१४,१६,१७,२०,२५ | ८ |
| २३ | २००४-०५ | ६,९,१४,१५,१६,१७,१८,१९,२१<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र. ९:- हातपंप विद्युतपंप वर्गणी वसुलीबाबत. (४.३३४(६)<br>परि.क्र.१९:- अपूर्ण बांधकामाबाबत. (४.३३२(२०) | ९ |
| २४ | २००५-०६ | ४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१५,१६,१७,१९,२०,२२,२३,२४,२५,२६,२७,२९,३१<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.१५ :- पंचायत समिती २०% सेस अंतर्गत १००% अनुदानावर ताडपत्री खरेदीबाबत (४.२३३)<br>परि.क्र.१६ :- हातपंप व विद्युतपंप वर्गणी थकबाकीबाबत. (४.७३०(१३)<br>परि.क्र.२३ :- अपूर्ण बांधकामाबाबत (कृषि विभाग) (४.७२८(२६)<br>परि.क्र.२४ :- उपविभागांकडील अपूर्ण बांधकामाबाबत (४.७२८(२६) | २३ |
| २५ | **लेखा परीक्षण अहवाल सन २००६ – २००७** | | २९ |
| परिच्छेद क्रमांक ३ :- अंदाजपत्रकाबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक ४:- वाढीव उपकरातुन महिला व बालकल्याण विभागामार्फत दोन चाकी लेडीज सायकलीचा पुरवठा करणे. (पंरास प्रस्तावित) | | | |
| परिच्छेद क्रमांक ५:- मागासवर्गीय लाभार्थ्यांना १००% अनुदानाने शेती उपयोगी ताडपत्री पुरविणे. (पंरास प्रस्तावित) | | | |
| परिच्छेद क्रमांक ६ : सेवा प्रवेशोत्तर परीक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण न होणेबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक ७:- विहीरीस आर.सी.सी.रिंगण बांधकाम करणे. | | | |
| परिच्छेद क्रमांक ९ :- निवासस्थान नोंदवहीबाबत. | | | |

| |
|---|
| परिच्छेद क्रमांक ११:- वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर केल्याबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १२ :- हातपंप व विद्युतपंप वर्गणी थकबाकीबाबत. (तक्तांकनाकरीता प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक १३ :- थकीत अग्रीम रक्कमा वसुलीबाबत. (तक्तांकनाकरीता प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक १४:- जवाहर विहीरीबाबत. (तक्तांकनाकरीता प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक १५:- आदिवासी उपाययोजनांतर्गत उपलब्ध निधीतुन अंगणवाडी इमारत बांधकाम करणे. (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक १८:- बाहयरुग्ण फी उशिरा भरणा केलेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २१:- अनामत रक्कमा व्यपगत करणेबाबत. (तक्तांकनाकरीता प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक २२:- अखर्चीत अनुदान शासन सदरी भरणा करणेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २५:- उपविभागांकडील अपुर्ण बांधकामाबाबत. (तक्तांकनाकरीता प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक २६:- जामीनदार हयात व लायक असलेचे दाखले न घेतलेबाबत |
| परिच्छेद क्रमांक २७:- अखर्चीत अनुदान शासनास परत पाठविलेबाबत. (तक्तांकनाकरीता प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक २८:- जवाहर रोजगार योजना विहीरी लाभार्थी प्रकरणांतील त्रुटीबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २९:- तालुका मास्तर यांचेकडील रोखवहीतील अनियमितता (तक्तांकनाकरीता प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक ३०:- बांधकाम उप-विभाग, बागलाण यांचेकडील नमुना नं. ३९,४०,४१ बाबत. |
| परिच्छेद क्रमांक ३१:- उप-विभाग (ल.पा.) यांचे कडील नमुना नं. ३९,४०,४१ बाबत. |
| परिच्छेद क्रमांक ३२:- वार्षिक लेखे. |
| परिच्छेद क्रमांक ३३ :- अनुपालन व पोहोच. |

टिप :- उपरोक्त नमुद केलेल्या आक्षेपांचे संदर्भात त्या त्या वर्षाच्या पुढील अभिप्रायांमध्ये नमुद केलेले आक्षेप क्रमांकच अंतीम समजणेत यावेत.

## भाग दुसरा
## (चालु लेखा परीक्षण )

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ ( अ ) खालील येणारी अनियमितता.

**परिच्छेद क्रमांक ३ :- अंदाजपत्रकाबाबत.**

पंचायत समिती बागलाणचे सन २००७ – २००८ चे मूळ अंदाजपत्रक पंचायत समिती ठराव क्रमांक १७२ दिनांक २.२.२००७ व सुधारीत अंदाजपत्रक ठराव क्र. ४९ व दिनांक १४.२.२००८ अन्वये मंजूर केलेले आहे. प्रत्येक शिर्षाखाली केलेल्या तरतुदीचा व खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

(आकडे रुपयांत)

| अ.क्र. | शिर्षक | तरतुद | प्रत्यक्ष खर्च | कमी खर्च | जादा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३ शिक्षण | ५,००० | -- | ५,००० | -- |
| २ | ४ बांधकाम इ व द | २,००,००० | -- | २,००,००० | -- |
| ३ | ५ लघुपाटबंधारे | -- | -- | -- | -- |
| ४ | ९ प्राथमिक आरोग्य | ५,००० | -- | ५,००० | -- |
| ५ | ११ शेती | २,५०० | -- | २,५०० | -- |
| ६ | १२ पशुसंवर्धन | २,५०० | -- | २,५०० | -- |
| ७ | १४ समाजकल्याण | ९०,००० | ७५,६०० | १४,४०० | -- |
| ८ | २० संकीर्ण महिला व बालकल्याण | ४५,००० | २८,९९५ | १६,००५ | -- |
| ९ | २० संकीर्ण महिला व बालकल्याण (इंधन व डिझेल) | -- | -- | -- | -- |
| | **एकूण** | ४,५०,००० | १,०४,५९५ | ३,४५,४०५ | -- |

सदर खर्चावर खालीलप्रमाणे सर्वसाधारण अभिप्राय देण्यात येत आहेत.

१)    सन २००७ – २००८ चे अंदाजपत्रक पंचायत समितीने वाजवी नियोजनपूर्वक वस्तुस्थितीस धरुन केले नसल्याचे दिसून येते. आर्थिक वर्षात आरोग्य, शिक्षण, लघुपाटबंधारे, बांधकाम या लेखाशिर्षावर कोणतीही रक्कम खर्च केलेली नाही.

२)    सन २००७ – २००८ ची सुरुवातीची शिल्लक रक्कम रु. १,०६,८४५/- व आर्थिक वर्षावरील जमा रक्कम रु.२,६८,६६९/- अशी एकूण जमा रक्कम रु.३,७५,५१४/- उपलब्ध असतांना व अंदाजपत्रकात तरतूद रक्कम रुपये ४,५०,०००/- ची केलेली असतांना रक्कम रुपये ३,४५,४०५/- खर्च कमी केलेला आहे.

३)    समाजकल्याण या लेखाशिर्षाखाली रक्कम रुपये ९०,०००/- तरतूद करुनही खर्च रक्कम रुपये ७५,६००/- कमी खर्च रक्कम रुपये १४,४००/- केल्याने काही मागासवर्गीय सदर लाभापासून वंचित राहिलेले आहेत. केलेला खर्च पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकांत धरुन अनुशेष भरुन काढावा. तसेच झालेल्या कमी खर्चास पंचायत समिती सभेचे क्षमापन घ्यावे.

४)    कमी / जादा केलेल्या खर्चाबाबत पंचायत समिती सभागृहाची मंजूरी घेऊन दाखवावी.

५)    मा. जिल्हाधिकारी / तहसिलदार, बागलाण यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून दिनांक ३१.३.२००८ अखेर पंचायत समितीचा किती उपकर वसूल झाला याचा तपशील पंचायत समितीस प्राप्त झाला नाही. तरी याबाबत त्वरीत ताळमेळ घेऊन उपकराच्या सर्व रक्कमा प्राप्त झाल्याचे प्रमाणित करुन अनुपालन दर्शवावे.

---

## परिच्छेद क्रमांक ४ :- पंचायत समिती बागलाण स्तरावरील लेखे व त्यांच्या रोकडवह्या यांचे ताळमेळाबाबत...

पंचायत समिती बागलाणचे सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षणात रोकडवही नमुना क्रमांक ७ ची पडताळणी करता दिनांक ३१.३.२००८ अखेर रोकडवहीनुसार शिल्लक व बँक पासबुकाप्रमाणे शिल्लक रक्कम यांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय नमुद करण्यात येत आहे.

अ) जिल्हा निधी

| | |
|---|---|
| दिनांक ३१.३.२००८ ची बँक पासबुकाप्रमाणे शिल्लक | रुपये १,४६,२५,०५९.३५ |
| रोकडवहीप्रमाणे शिल्लक | रुपये ८८,३९,६५९.६१ |
| तफावत | रुपये ५७,८५,३९९.७४ |

उपरोक्त तफावतीबाबत खालीलप्रमाणे ताळमेळ नोंदविण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| १) न वटलेले धनादेश | रुपये ३,११,३१,६७२.०० |
| २) बँकेने जमा घेतलेली परंतु रोखवहीत जमा न घेतलेली रक्कम | रुपये १५,७४५.६० |

| | | |
|---|---|---|
| | (+) | रुपये ३,११,४७,४१७.६० |
| ३) (वजा) जमा रक्कम बँकेने जमा केली नाही | | रुपये २,५३,३८,०६०.०० |
| ४) (वजा) जिल्हा निधीतून बँकेने चुकीने दर्शविलेले प्रदान | | रुपये २३,९५७.८६ |
| | ( - ) | रुपये २,५३,६२,०१७.८६ |
| | (+) | रुपये ५७,८५,३९९.७४ |
| तफावत | | रुपये निरंक |

वरीलप्रमाणे ताळमेळ दर्शविण्यात आला असून रुपये १५,७४५.६० ही बँकेने जमा दर्शविलेली रक्कम रोखवहीत जमा घेतलेली नाही. तसेच बँकेने जिल्हानिधीतून चुकीचा खर्च रुपये २३,९५७.८६ दर्शविला आहे. याबाबत सदर रक्कमांचा शोध घेऊन आवश्यक तो जमा व खर्च रोखवहीत नोंदवून पुर्तता लेखापरीक्षणात दर्शवावी.

रोखवहीत दिनांक ३१.३.२००८ रोजी शिल्लक रक्कम रुपये ८८,३९,६५९.३१ ही असंवितरीत रक्कम कोणत्या लेखाशिर्षाची व कधीपासून प्रलंबित आहे. याबाबत योग्य तो बाबनिहाय तपशिल नोंदविलेला नाही. असंवितरीत शिल्लक रक्कमेचा शोध घेऊन ताळमेळ दर्शवावा. तसेच शिल्लक शासकिय अनुदानाच्या रक्कमा शासनाकडे योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करुन तसे अनुपालन दर्शवावे.

ब) जिल्हा परिषद सेस व अभिकरण –

(आकडे रुपयांत)

| अ. क्र. | तपशिल | जिल्हा परिषद सेस | अभिकरण |
|---|---|---|---|
| १ | दि. ३१.३.२००८ ची बँक पासबुकाप्रमाणे शिल्लक | ८३,२८,१२९ | ५५,७१,६८९ |
| २ | दिनांक ३१.३.२००८ ची रोखवहीप्रमाणे शिल्लक | ७७,१३,०६१ | १३,९९,००१ |
| | **तफावत** | **६,१५,०६८** | **४१,७२,६८८** |
| याबाबत खालीलप्रमाणे ताळमेळ नोंदविला आहे. | | | |
| १ | न वटलेले धनादेश (+) | ७५,३०,७८७ | ४३,८५,६७८ |
| २ | जमा रक्कम बँकेने जमा दर्शविली नाही (-) | ६९,१५,७१९ | २,१२,९९० |
| | | **६,१५,०६८** | **४१,७२,६८८** |

वरीलप्रमाणे ताळमेळ नोंदविण्यात आला असून दिनांक ३१.३.२००८ रोजी शिल्लक दर्शविलेली रक्कम कोणत्या लेखाशिर्षाची व कधीपासून प्रलंबित आहे, याबाबत योग्य तो बाबनिहाय तपशील नोंदविण्यात आलेला नाही. असंवितरीत रक्कमेचा शोध घेऊन ताळमेळ दर्शवावा व पुर्तता लेखापरीक्षणात दर्शवावी.

क) पंचायत समिति सेस

| | |
|---|---|
| दिनांक ३१.३.२००८ ची बँक पासबुकाप्रमाणे शिल्लक | रुपये ३,१५,०५७.९६ |
| दिनांक ३१.३.२००८ ची रोकडवहीप्रमाणे शिल्लक | रुपये २,९३,५०४.७१ |
| तफावत | रुपये २१,५५३.२५ |

उपरोक्त तफावतीबाबत खालीलप्रमाणे ताळमेळ नोंदविण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| न वटलेले धनादेश | रुपये १,०७,४६७.०० |
| बँकेने जादा दर्शविलेली रक्कम | रुपये ०.२५ |
| | रुपये १,०७,४६७.२५ |
| (वजा) जमा रक्कम बँकेने जमा घेतलेली रक्कम | रुपये ८१,३२२.०० |
| बँकेने चुकीने खर्च दर्शविलेली रक्कम | रुपये २४०.०० |
| बँकेने चुकीने खर्च दर्शविलेली रक्कम | रुपये २,९३५.०० |
| प्रमाणक क्रमांक २ ची जादा प्रदान रक्कम | रुपये १,४१६.०० |
| प्रमाणक क्रमांक १ ची जादा प्रदान रक्कम | रुपये १.०० |
| | रुपये ८५,९१४.०० |
| | रुपये २१,५५३.२५ |
| तफावत | निरंक |

वरीलप्रमाणे ताळमेळ नोंदविण्यात आला असून –

१) अ.क्र. २ व ३ ची बँकेने चुकीने खर्च दर्शविलेली रक्कम रुपये २४० व रुपये २,९३५/- ही जिल्हा परिषद सेस धनादेशाची आहे. याबाबत योग्य ते समायोजन करुन पुर्तता दर्शवावी.

२) अ.क्र. ४ ची रक्कम ही प्रमाणक क्रमांक २ दिनांक ३०.३.२००६ ची देयकाची (रक्कम रुपये ५३,८९६/- वजा आयकर रुपये १,४१६/-) निव्वळ देय रक्कम रुपये ५२,४८०/- अशी असतांना प्रत्यक्ष प्रदान रुपये ५३,८९६/- करण्यात आली असून रुपये १,४१६/- आयकर खाती स्वतंत्र धनादेशाद्वारे प्रदान केली आहे. म्हणजेच प्रमाणकांपेक्षा जादा रक्कम रुपये १,४१६/- दर्शविली आहे. याबाबत संबंधित ठेकेदाराकडून त्वरीत वसूलीबाबत योग्य ती कार्यवाही करुन रक्कम जमा करुन पुर्तता दर्शवावी.

३) अ.क्र. ५ ची प्रमाणक क्रमांक १ दिनांक १७.३.२००६ ची रक्कम रुपये १/- ने जादा प्रदान करण्यात आलेली आहे. (रुपये १,१९,५९५/- ऐवजी रुपये १,१९,५९६/- प्रदान केलेले आहे.) सदरची रक्कम त्वरीत वसूल करुन जमा करुन पुर्तता दर्शवावी.

## परिच्छेद क्रमांक ५ :- नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेनुसार कपात केलेल्या अशंदान रक्कमेबाबत.

पंचायत समिती बागलाण यांनी दिनांक १.११.२००५ नंतर सेवेत दाखल झालेलया कर्मचा-यांची निवृत्ती वेतन अंशदानाची रक्कम सन २००६ – २००७ मध्ये रुपये ७८,१९४/- व सन २००७ – २००८ मध्ये रुपये १,९४,०७६/- अशी एकूण रुपये २,७२,२७०/- कपात करुन ठेव सदरी जमा केलेली आहे.

या संदर्भात खालील अभिप्राय नमुद करण्यात येत आहेत:

१) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अंनियो-१००७/१८/सेवा-४ दिनांक ७.७.२००७ अन्वये नवीन परिभाषित अशंदान निवृत्ती वेतन योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ८ नुसार सर्व आहरण व संवितरण अधिका-यांनी दिनांक १.११.२००५ नंतर सेवेत दाखल झालेल्या कर्मचा-यांची माहिती नमुना नंबर १ मध्ये प्राप्त करुन राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, मुंबई यांना सादर करुन सदर कर्मचा-यांचा "निवृत्ती वेतन लेखा क्रमांक" प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

तसेच उपरोक्त शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक २८ नुसार जिल्हा परिषदेतील कर्मचा-यांना योग्य त्या फेर फारांसह सदर योजना लागू करण्यात आली असून कर्मचा-यांच्या अंशदानाइतके समतुल्य अंशदान राज्य अभिलेख देखभाल अभिकरणास जमा करणे आवश्यक आहे.

तथापि पंचायत समिती, बागलाण यांनी राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, मुंबई यांचेकडून अद्यापपावेतो संबंधित कर्मचा-यांचे निवृत्ती वेतन लेखा क्रमांक प्राप्त करुन घेतलेले नाही, कर्मचा-यांकडून कपात केलेली अशंदानाची रक्कम ठेव सदरी जमा ठेवलेली आहे. तसेच कर्मचारी अंशदानाइतके समतुल्य जिल्हा परिषदेचे अंशदान प्रदान करण्याबाबत कोणतीही तरतुद केलेली नाही.

सदर अंशदान हे कर्मचा-यांना भविष्यात देय होणा-या निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनाशी निगडीत असल्याने तसेच कपात केलेल्या अशंदान व संस्थेचे समतुल्य अशंदान व त्यांवर देय होणारे व्याज या बाबतची सर्वस्वी जबाबदारी ही, राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, मुंबई यांचेकडे रक्कम जमा होईपावेतो कार्यालय प्रमुख या नात्याने पंचायत समितीच्या गटविकास अधिका-यांची आहे.

तरी संबंधित कर्मचा-यांचे निवृत्ती लेखा क्रमांक प्राप्त करणेसाठी आवश्यक ती कार्यवाही त्वरीत पूर्ण करुन ठेव सदरी जमा रक्कम व समतुल्य अंशदान राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, मुंबई यांचेकडे भरणा करुन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

**परिच्छेद क्रमांक ६ :- वाढीव उपकरातून महिला व बालकल्याण विभागामार्फत दोन चाकी लेडीज सायकलींचा पुरवठा करणे.**

| | |
|---|---|
| प्रशासकीय मंजूरी | पंचायत समितीचा दिनांक १८.१२.२००७ च्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्रमांक ४२ रक्कम रुपये ३०,०००/- |
| तांत्रिक मंजूरी | गटविकास अधिकारी, पंचायत समिती बागलाण जा.क्र.पंस/२१/०८ दि. १३.२.२००८ अन्वये रुपये ३०,०००/- |
| योजनेचे उद्दीष्ट | दारिद्रय रेषेखालील व आर्थिक दुर्बल घटकातील, शाळेपासून २ ते ५ कि.मी. अंतरापर्यंत राहणा-या इयत्ता ५ ते १० वी पर्यंत शिक्षण घेणा-या मुलींना लेडीज सायकल पुरविणे |
| लेखाशिर्षक | २० संकिर्ण पंचायत समिती सेस |
| एजन्सीचे नाव | मिना एंटरप्रायजेस्, मेनरोड, पिंपळगाव बसवंत, जि. नाशिक |
| खर्च नोंद | प्रमाणक क्रमांक २ दिनांक ३१.३.२००८ रुपये २८,९९५/- |

या संदर्भात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत :

१) जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाकडून राबविलेल्या खरेदी कार्यपध्दतीबाबत म. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे कोणतेही आदेश पंचायत समिती बागलाण यांना प्राप्त झाले नाहीत. त्यामुळे खरेदीची प्रक्रिया कोणत्या प्रकारे व कोणती पध्दती अवलंबविली, याबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही. खरेदी प्रक्रियेसंबंधिची आवश्यक दस्तऐवज लेखापरीक्षणास सादर करुन ही प्रक्रिया योग्य असल्याची खात्री पटवावी.

२) शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक -१०९३/१२३९/३४ दिनांक १ सप्टेंबर १९९३ अन्वये लाभार्थ्यांची गावनिहाय व जातनिहाय नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुहे एकाच लाभार्थ्यास दुबार लाभ प्रदान झले नसल्याबाबत खात्री पटविणे आवश्यक आहे.

३) सायकल विक्रेता हा कोणत्या कंपनीचा अधिकृत विक्रेता आहे. याबाबतचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

४) ग्रामविकास विभागाच्या दिनांक २९.७.१९८३ च्या परिपत्रकातील सुचनेनुसार योजनेचा उद्देश सफल झाल्याबाबत गटविकास अधिकारी यांचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

५) खालील लाभार्थ्यांचे त्यांचे प्रकरणासोबत मुख्याध्यापक यांचे शाळेचे दाखले उपलब्ध नाहीत. १) जयश्री खंडू पवार
२) सोनाली सुरेश बोरसे

६) लाभार्थ्यांचे कोरे करारनामे दप्तर दाखल आहेत. तसेच महिला व प्रकल्प अधिकारी, बागलाण यांनी करारनामा पूर्ण करुन स्वाक्षरी केलेली नाही. यावरुन करारनामा वैध आहे असे म्हणता येणार नाही.

उपरोक्त अभिप्रायांची पुर्तता होईपर्यंत खर्च रुपये २८,९९५/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

पंचायत समिती वाढीव उपकर
आक्षेपाधिन रक्कम रुपये २८,९९५/-

---

**परिच्छेद क्रमांक ७ :- मागासवर्गीय लाभार्थ्यांना १००% अनुदानावर शेती उपयोगी ताडपत्री पुरविणे**

| | |
|---|---|
| योजनेचे नाव | पंचायत समिती सेस अनुदान सन २००७ – २००८ मागासवर्गीयांसाठी करावयाच्या समाजकल्याण शिर्षाखालील योजना |
| प्रशासकीय मंजूरी | सर्वसाधारण सभा ठराव नंबर ४२ (अ) दिनांक १८.१२.२००७ अन्वये रुपये ९०,०००/- |
| तांत्रिक मंजूरी | गटविकास अधिकारी, पंचायत समिती बागलाण दि. १८.३.२००८ |
| पुरवठादार | भारतीय राष्ट्रीय उपभोक्ता सहकारी संघ मर्यादित, मुंबई शाखा, नाशिक |
| खर्च | प्रमाणक क्र. १ दिनांक ३१.३.२००८ अन्वये रुपये ५९,८५०/- व प्रमाणक क्रमांक ३ दिनांक ३१.३.२००८ अन्वये रुपये १५,७५०/- असा एकूण खर्च रुपये ७५,६००/- |

या संदर्भात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत :

१) शासन परिपत्रक ग्रामविकास विभाग क्र. १०८९/प्र.क्र.५५/३४ दिनांक ५.१०.१९८९ नुसार योजनेतील लाभार्थ्यांची एकत्रित नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतु तशी नोंदवही न ठेवल्याने लाभधारकाने समाजकल्याण विभाग व कृषि विभाग, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून स्वतंत्ररित्या लाभ घेतला किंवा कसे याबाबत खात्री करता आली नाही. त्यामुळे दुबार लाभ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबबात प्रमाणित करुन अनुपालन दर्शवावे.

२) ग्रामविकास विभागाकडील दिनांक २९.७.१९९३ च्या परिपत्रकातील सुचनांनुसार गटविकास अधिकारी यांनी योजनेसंबंधी उपभोगिता प्रमाणपत्र निर्गमित न केल्याने योजनेच्या यशस्वितेबद्दल खात्री पटवावी.

३) खालील लाभार्थ्यांची प्रतिज्ञापत्रके घेण्यात आलेली नाहीत.

१) गोकुळ मणिराम पवार — पठावे
२) शिवराम रामा चौरे — जाखोड
३) राम काळू बागूल — अलियाबाद

| | |
|---|---|
| ४) नामदेव दाजी सूर्यवंशी | गोळवाड |
| ५) महादु काळू बागुल | अलियाबाद |
| ६) शंकर काळू पवार | अलियाबाद |
| ७) रामभाऊ दशरथ जगताप | चा. पाडा |
| ८) काशिनाथ दादाजी गांगुर्डे | पठावे |
| ९) अभिमन लक्ष्मण ठाकरे | भावनगर |
| १०) रंगनाथ गंगाराम चौरे | भावनगर |

प्रतिज्ञापत्र न घेताच वस्तुरुपाने अनुदान वितरीत केल्याने तांत्रिक मंजूरीची अटी व शर्तींचे पालन करण्यात आले नाही. याबाबत पंचायत समिती सभेचे क्षमापन घ्यावे.

उपरोक्त अभिप्रायांची पुर्तता होईपावेतो खर्च रुपये ७५,६००/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

पंचायत समिती वाढीव उपकर
आक्षेपाधिन रक्कम रुपये ७५,६००/-

---

**परिच्छेद क्रमांक ८ :- तालुका मास्तर यांचेकडील रोखवहीतील अनियमिततांबाबत.**

तालुका मास्तर, बागलाण व पंचायत समिती बागलाण यांचेकडील अभिलेखे पहाता पंचायत समितीकडून तालुका मास्तर यांना सन २००७ – २००८ मध्ये कोणत्याही प्रकारच्या रक्कमा प्रदान करण्यात आलेल्या नाहीत असे दिसते. तालुका मास्तर यांचेकडील दिनांक ३१.३.२००७ ची शिल्लक रक्कम व सन २००७ – २००८ मध्ये कळवण प्रकल्पाअंतर्गत थेट प्राप्त रक्कमा व त्या रक्कमांमधून केलेले प्रदान याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय नमुद करण्यात येत आहे.

१) तालुका मास्तर बागलाण यांनी रोखवहीत माहे फेब्रुवारी २००८ पर्यंतचे व्यवहार नोंदविले असून माहे मार्च २००८ पासून लेखापरीक्षण कालावधीपर्यंत कोणतेही व्यवहार नोंदविलेले नाहीत व माहे सप्टेंबर २००७ नंतर बँक स्क्रोल ही प्राप्त केलेले नाही. तरी रोखवहीत परिपूर्ण व्यवहार नोंदवून व बँक स्क्रोल प्राप्त करुन पडताळणी करुन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

२) दिनांक ३१.३.२००८ अखेर रोखवहीतील शिल्लक खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| रोखवहीतील शिल्लक रक्कम | रुपये ६,५८,६२२/- |
| बँक प्रमाणपत्रानुसार शिल्लक रक्कम | रुपये ६,५८,६२२/- |
| तफावत | निरंक |

दिनांक ३१.३.२००८ अखेर शिल्लक रक्कम रुपये ६,५८,६२०/- बाबत बाबनिहाय गोषवारा काढलेला नाही. त्यामुळे सदर रक्कमा कोणत्या रक्कमेतून

असंवितरीत राहिलेल्या आहेत, त्या कोणास देय आहेत याबाबतच्या तपशिलाची लेखापरिक्षणात पडताळणी करता आलेली नाही. याबाबत सन २००६ – २००७ च्या लेखापरीक्षण अहवालात परिच्छेद क्रमांक २९ नोंदवूनही कोणतीही कार्यवाही केलेली नाही. पंचायत समिती स्तरावरील सक्षम अधिकारी व जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने असंवितरण रक्कमांबाबत लेखापरीक्षणात आक्षेप नोंदवूनही कोणतीही दखल घेतलेली नाही ही बाब अतिशय गंभीर स्वरुपाची आहे. सदर अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन नोंदवही परिपूर्ण करुन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

३) दिनांक ३१.३.२००८ अखेरची शिल्लक रक्कम रुपये ६,५८,६२२/- ही प्रदिर्घ कालावधीपासून शिल्लक असल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चा नियम ७७(३) नुसार ३ महिन्यांपेक्षा प्राप्त कालावधीसाठी असंवितरीत राहिलेली रक्कम चलनाने परत भरणा करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही. तरी सदर रक्कमा जमा सदरी चलनाने भरण करुन या अनियमिततेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे क्षमापन घेऊन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

४) तालुका मास्तर बागलाण यांनी दिनांक ३१.३.२००७ अखेर शिल्लक रक्कमेतून खालीलप्रमाणे प्रदाने केली आहेत:

| व्यवहाराचा दिनांक | कोणास प्रदान केले | रक्कम रुपये | प्रदान रक्कमेचा तपील |
|---|---|---|---|
| ७.९.२००७ | मुख्याध्यापक जनता विद्यालय, मुल्हेर | ७,२०० | मुलींचा उपस्थित भत्ता |
| २४.९.२००७ | श्रीमती. शहानी अबु सोमनिल | ५०० | माहे १०/०६ चे मानधन |
| २४.९.२००७ | श्रीमती. हिराबाई तुकाराम चव्हाण | २,५०० | माहे ११/०६ ते २/०७ भाऊबीज |
| १२.१२.२००७ | श्री. राजेंद्र दौलत पवार | ८,७९४ | माहे ४/०४, ९/०४, ९/०५ व २/०६ चे वेतन |
| १२.१२.२००७ | श्रीमती. शोभा अरुण बच्छाव | २,५०० | माहे ११/०६ ते २/०७ भाऊबीज |
| ८.१.२००८ | श्रीमती. पद्‌मा प्रकाश कुलकर्णी | ६९९ | बालवाडी मानधन व भाऊबीज माहे ११/०६ |
| ८.१.२००८ | श्रीमती. ललिता जगन्नाथ नंदन | ६९९ | बालवाडी मानधन व भाऊबीज माहे ११/०६ |
| | **एकूण** | २२,८९२ | |

वरीलप्रमाणे रक्कमा ह्या ३ महिन्यांपेक्षा जासत काळ असंवितरीत असतांना नियमबाह्य प्रदान करण्यात आलेल्या आहे. याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिका-यांचे क्षमापन प्राप्त करुन घेऊन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

५) तालुका मास्तर यांचेकडील रोखवहीत पृष्ठे क्रमांक १,२,५,७,९,११,१३,१५ व १७ कोरी सोडण्यात आलेले आहेत. कोरी पृष्ठे रद्द करुन स्वाक्षांकित केलेली नाहीत. कोरी पृष्ठे काय हेतूने सोडण्यात आली, याबाबत साधार स्पष्टीकरण द्यावे.

६) रोखवहीत समाविष्ठ पृष्ठांवर कार्यालयीन गोल मोहर उमटवून त्याबाबत शेरा अंतिम पृष्ठांवर नमुद केलेला नाही.

उपरोक्त उणिवांची पुर्तता करुन रोखवहीतील व्यवहार बरोबर नोंदविल्याची खात्री करुन तसे अंतर्गत लेखापरीक्षणाकडून प्रमाणित करवावे व अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ ( ब ) खाली येणारी अनियमितता

---

**परिच्छेद क्रमांक ९ :- वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापराबाबत.**

सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षणाचेवेळी पंचायत समिती बागलाण येथील वाहनलेख्यांची पडताळणी करण्यात आली. आर्थिक वर्षात विभागाचे वाहन एम. एच. १५ ए ए ५०७८ कार्यक्षेत्राबाहेर फिरल्याच्या नोंदींचा तपशील सोबतच्या परिशिष्ट क्र. “ अ ” मध्ये दिला आहे. वाहन वापरण्यापूर्वी सक्षम वरिष्ठ अधिका-यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही झालेली नाही.

शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्र. जेईपी/२४६९/१७७०३/डी-१/ दिनांक १४.११.१९६९ अन्वये वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर करण्यापूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही झालेली नाही. तसेच शासन निर्णय ग्रा.वि.वि.क्र. जेईपी/१०/सीआर/५९/००/०५ दिनांक २४.४.२००० अन्वये पूर्वपरवानगी शिवाय त्यांचे वापरातील वाहन कार्यक्षेत्राबाहेर वापरल्यास कार्योत्तर मंजूरी अनुज्ञेय नाही.

शासन निर्णय वित्त विभाग क्र.प्रवास/१००५/प्रक्र३३/सेवा ५/दि.८.७.२००५ नुसार कार्यक्षेत्राबाहेरील प्रवासास एकूण किलोमीटर ९३२० ची रुपये ८/- प्रति कि.मी. प्रमाणे संबंधितांकडून रुपये ७४,५६०/- वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

वसुलपात्र रक्कम रुपये ७४,५६०/-

---

**परिच्छेद क्रमांक १० :- हातपंप, विद्युतपंप वर्गणी थकबाकीबाबत.**

पंचायत समिती, बागलाणच्या सन २००७ – २००८ साठीच्या हातपंप / विद्युतपंप देखभाल दुरुस्तीची वर्गणी नोंदवहीची पडताळणी केली असता या सोबतच्या परिशिष्ट क्रमांक " ब " मध्ये दर्शविणेत आलेप्रमाणे दिनांक ३१.३.२००८ अखेर हातपंप देखभाल दुरुस्ती वर्गणी रक्कम रुपये १,२१,२७४/- व विद्युतपंपाची वर्गणी रक्कम रुपये २,०४,०४०/- अशी एकुण रक्कम रुपये ३,२५,३१४/- अदयापही ग्रामपंचायतीकडून वसुल करणे बाकी आहे.

याबाबत पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे आदेश क्रमांक भुजल १०९५/ प्र.क्र. २१७/४३ दिनांक १७.१.१९९६ अन्वये हातपंप / विद्युतपंपाची देखभाल व दुरुस्तीची प्रलंबित वग्रणी संबंधित ग्रामपंचायतीकडून रोख स्वरुपात अथवा देय अनुदानातुन सत्वर वसुल करावी व पुर्तता दाखवावी.

---

**परिच्छेद क्रमांक ११ :- ग्रामपंचायत अफरातफर प्रकरणे व प्रलंबित न्यायालयीन प्रकरणांमध्ये अंतर्भूत रक्कमांबाबत.**

अर्धसमास पत्र क्रमांक ४ दिनांक २९.८.२००८ अन्वये पंचायत समिती, बागलाणचे कार्यक्षेत्रातील प्रलंबित अफरातफर प्रकरणे, निकाली लागलेली प्रकरणे, प्रलंबित कोर्ट केसेस, त्यावर झालेला खर्च, कोर्टाचे लागलेले निकाल, प्रलंबित केसेस, त्यावंर केसचे संभाव्य दायित्वाची एकूण रक्कम इत्यादींबाबत माहिती मागविण्यात आली होती.

पंचायत समिती बागलाण यांनी उपरोक्त अर्धसमास पत्रांस अनुसरुन प्राप्त माहिती या अहवालासोबतच्या परिशिष्ट क्रमांक " क " मध्ये नमुद आहे, उपलब्ध केलेल्या माहितीन्वये अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

१) एकूण ४ कोर्ट केसेस प्रलंबित असून सदर प्रकरणे निकाली काढण्यासाठी कुठलीही ठोस कार्यवाही केलेली नाही. नोंदवही अपूर्ण असल्याने कोर्ट केसेस निहाय खर्च त्यांचे लागलेले निकाल, निकालाअंती संभाव्य दायित्वाची रक्कम याबाबत पडताळणी करता आलेली नाही.

२) ग्रामपंचायत अफरातफरीच्या एकूण ४० प्रकरणांपैकी २१ प्रकरणे निकालास्तव जिल्हा परिषदेने सादर करण्यात आलेली आहेत. पंचायत समिती स्तरावर १५ प्रकरणे प्रलंबित आहेत. ग्रामनिधी अपहारातील रक्कम रुपये ८७,७२१/- जवाहर रोजगार योजनेतील रुपये ३,५१,६४५/- अशी एकूण रुपये ४,३९,३६६/- वसूली प्रलंबित आहे. सदर अपहार रक्कम वसूलीबाबत कोणतीही ठोस कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

३) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-२००५/प्र.क्र.२६२/पंरास दिनांक ३.९.२००५ नुसार अपहाराची रक्कम वसूल करणे व संबंधितांविरुध्द फौजदारी गुन्हे सादर करणे आवश्यक आहे. तथापि या अपहार अथवा गैरव्यवहार प्रकरणांबाबत बहुतांशी प्रकरणी वेळीच योग्य ती कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. शासनाच्या आदेशाचा यामुळे भंग झाला आहे.

याबाबत जबाबदारी निश्चित करुन उचित प्रशासकीय कार्यवाहीसह या गंभीर अनियमिततेस शासनाचे क्षमापन प्राप्त करुन घ्यावे व त्यावरील कार्यवाही अहवालांसह अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

---

**<u>परिच्छेद क्रमांक १२ :- जवाहर विहिरींबाबत..</u>**

शासनाने सन १९८८ – १९८९ पासून आर्थिक दृष्टया कमकुवत शेतक-यांचे आर्थिक बाबतीत स्वयंपूर्ण करणेकामी १००% विहिर खोदकाम व बांधकाम करणेची योजना हाती घेतली आहे. बागलाण तालुक्यात सदर योजना उपरोक्त वर्षापासून कार्यरत आहे. या अहवालासोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट क्रमांक “ ड ” मध्ये नमुद केल्याप्रमाणे पूर्ण विहीरींबाबतचा तपशील नमुद करण्यात आला आहे.

याबाबत खालील त्रुटी नमुद करण्यात येत आहे.

१) महाराष्ट्र शासन नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक १२९८/प्र.क्र.१०४/रोहयो/१०/दिनांक १.७.१९९८ मधील परिच्छेद कमांक १७ व १८ नुसार विहिरीचे काम प्रशासकीय मान्यतेच्या आदेशातील दिनांकापासून २ महिन्याचे आत सुरु करुन पुढील १२ महिन्याचे आत काम पूर्ण करावयाचे असतांना त्याप्रमणे शासनाचे आदेशाचे पालन झालेले नाही. तरी याबाबत शासनाचे क्षमापन घेऊन अनुपालन दर्शवावे.

२) लाभार्थीचे दस्तऐवज तपासले असता विहीरींचे खोदकाम वेळीच पूर्ण झाले नसल्याने रोजगार हमी योजनेसाठीच्या वाढीव दरांनुसार खोदकाम करावे लागल्याने खर्चात वाढ होऊन फक्त खोदकामासाठीच रुपये ६०,०००/- खर्च झाला आहे. त्यामुळे विहीरींच्या भिंतीचे बांधकाम झालेले नाही. त्यामुळे भविष्यात पावसाने विहीर खचून अनुदान व्यर्थ जाण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

३) विहीरींना लागलेल्या पाण्यामुळे किती लाभधारकांनी विज पंप मिळविणेसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे कोटेशन भरले अथवा कोटेशन मंजूर झालेत या माहिती उपलब्ध झाली नाही.

४) लेखासंहिता नियम १६८ व शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्रमांक/झेडपी/अे/१०५३/४७६९/सीआर/१४५९/२८ दिनांक ४ सप्टेंबर १९८५ नुसार विहीत टक्केवारी तपासणी कार्यकारी अभियंता यांनी केलेली नाही.

५) लाभार्थ्यांनी विहीर खोदाई मंजूर झालेल्या गटातच केली असल्याची खात्री लेखापरीक्षणास करता आली नाही. तरी लाभार्थ्यांच्या ७/१२ उता-यावर महसूल विभागाकडून जवाहर विहीर अशी नोंद करुन खात्री पटविणे आवश्यक आहे.

६) योजनेच्या लाभार्थ्यांची गावनिहाय मास्टर नोंदवही दप्तरी ठेवलेली नाही. त्यामुळे एकाच लाभार्थ्यांस अथवा एकाच कुटूंबातील पत्नी, मुलगा यांना लाभ देण्यात येऊन दुबार लाभ प्रदान झाला किंवा कसे याबाबत खात्री लेखापरीक्षणास करता आली नाही. मास्टर नोंदवही ठेऊन व अनुदान लाभार्थींची नोंद करुन पुर्तता दर्शवावी.

७) या अहवालासोबतच्या परिशिष्ट क्रमांक " ड " मध्ये नमुद केल्यानुसार सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षात एकूण १९ विहीरी पूर्ण केल्या आहेत. अंतिम देयक प्रान करतांना पूर्णत्वाचा दाखला न घेताच लाभार्थ्यांना अनुदान वितरीत करुन अनियमितता केलेली आहे. याबाबत तांत्रिक अधिकारी यांचे वर जबाबदारी निश्चित करुन अनुपालन दर्शवावे.

शिर्षक
जरोयो विहीर
शासकिय अनुदान (योजना)

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ ( क ) खाली येणारी अनियमितता

---

**परिच्छेद क्रमांक १३ :- थकीत अग्रीम रक्कमा वसुलीबाबत.**

या अहवालासोबत जोडण्यात आलेल्या विवरणपत्र क्रमांक " ३ (अ) " नुसार दिनांक ३१.३.२००८ अखेर रक्कम रुपये १,४२,०३९/-, कार्यालयातील कर्मचारी /प्राथमिक शिक्षक यांचेकडे उत्सव, धान्य, प्रवासभत्ता, वेतन इत्यादी प्रकारच्या अग्रीमांच्या स्वरुपात, सन १९७३ – १९७४ पासुन थकीत असल्याचे दिसून येते.

शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक लेपुअ/१०९२/ प्र.क्र.१४६९/३० दिनांक २६.२.१९९३ अन्वये दिलेल्या सुचनेनुसार गटविकास अधिकारी यांनी ठोस कार्यवाही करुन थकीत अग्रीमाची संपूर्ण रक्कम रुपये १,४२,०३९/- वसुल करणेची कार्यवाही करावी आणि तसे अनुपालन लेखा परीक्षणात दाखवावे.

देण्यात आलेल्या अग्रीम रक्कमांची वसुली / समायोजन वेळीच होणे आवश्यक आहे. अग्रीम रक्कमांची वसुली वेळीच न झाल्यास जबाबदार असणारे अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द योग्य ती कार्यवाही करुन अनुपालन दाखवावे.

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३०
## चे कलम ९ ( ड ) खाली येणारी अनियमितता

---

**परिच्छेद क्रमांक १४ :- ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी यांच्या दैनंदिन्या सादर नसतांना वेतन व भत्ते अदा केलेबाबत.**

पंचायत समिती बागलाण येथील सन २००७ – २००८ वर्षात सोबत जोडलेले परिशिष्ट क्रमांक “ इ ” नुसार विषयांकीत दैनंदिन्या प्राप्त झालेल्या नसल्याचे नोंदवहीवरुन स्पष्ट होते.

ग्रामविकास अधिकारी व ग्रामसेवक यांच्या दैनंदिन्या सादर नसतांना वेतन व भत्ते अदा करणेबाबत संबंधिताची जबाबदारी निश्चित करण्यात यावी. अदा केलेल्या संपूर्ण कालावधीत हे सर्व कर्मचारी व अधिकारी विहित कर्तव्यासाठी कार्यरत असल्याचे व त्यांनी विहीत इष्टांकपूर्ती केल्याचे प्रमाणित करुन अनुपालन लेखापरीक्षणास सादर करण्यात यावे.

---

**परिच्छेद क्रमांक १५ :- मुदतबाहय धनादेश प्राप्त करुन रदद न केलेबाबत.**

पंचायत समिती बागलाण सोबतच्या परिशिष्ट क्रमांक “ फ ” नुसार जिल्हा परिषद वाढीव उपकर व जिल्हानिधीची रोखवही तपासली असता दिनांक ३१.३.२००८ अखेर काही धनादेश एक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी न वटल्याचे आढळून आले.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ३१ अन्वये असे न वटलेले मुदतबाहय धनादेश प्राप्त करुन रद्य करणे आवश्यक आहे. तथापी मागील लेखा परीक्षण अहवाल सन २००६ – २००७ मध्ये परिच्छेद क्रमांक १९ नोंदवूनही अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. तरी याबाबत संबंधितांवर उचित प्रशासकीय कारवाई करावी व सदरचे धनादेश रद्य करुन रक्कमा योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा केल्याचे अनुपालन लेखापरीक्षणांस दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक १६ :- उपविभागांकडील अपुर्ण बांधकामाबाबत.**

बांधकाम उपविभाग बागलाण यांचेकडे सोबतच्या परिशिष्ट क्रमांक ६ मध्ये नमुद केलेप्रमाणे सन १९७७-७८ पासुन कामे अपूर्ण आहेत. अपुर्ण कामांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | विभाग | संख्या | गुंतलेली रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | बांधकाम विभाग (शाळाखोली बांधणे) | १३ | २,०२,४९९ |
| | शिक्षक निवासस्थान | १० | १,६६,६६९ |
| | **एकूण** | **२३** | **३,६९,१६८** |

उपरोक्त एकूण २३ कामामध्ये रुपये ३,६९,१६८/- एवढी रक्कम गुंतून पडलेली आहे. सदरची कामे वेळीच पूर्ण न झाल्याने योजनेचा फायदा ग्रामिण भागातील शेतकरी व जनतेला झालेला नाही. तसेच अपूर्ण अवस्थेतील कामे काळाच्या ओघात निकृष्ट होऊन आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शासनाचे उद्दिष्ट सफल होत नाही. तरी नवीन कामे व विहीर प्रकरणे मंजूर करण्यापूर्वी अपूर्ण कामांना प्रथम प्राधान्य देऊन ती पूर्ण करावीत. विवरणपत्रात दर्शविलेली सर्व कामे पूर्ण करुन प्रत्येक कामाचा नियोजित उद्देश सफल झाल्याबाबत विनियोग अहवालांसह अनुपालन दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक १७ :- निवृत्ती वेतन नोंदवहीतील अनियमितता (सामान्य प्रशासन)**

पंचायत समिती, बागलाण अंतर्गत सामान्य प्रशासन विभागाकडील निवृत्ती वेतन प्रदान प्रकरणांची सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय नमुद करण्यांत येत आहे.

१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे परिशिष्ट ४ – ६९ नुसार नमुना क्रमांक एपीपी – ९ ह्या नमुन्यात पेन्शन प्रदानाची नोंद ठेवणे आवश्यक आहे. पंचायत समिती बागलाण अंतर्गत सामान्य प्रशासन विभागाने विहीत नमुन्यातील एकूण २ भागात एकूण २१२ निवृत्ती, कुटूंबनिवृत्ती वेतन धारकांचा तपशील नोंदविला आहे.

सदर नोंदवहीतील डावीकडील पृष्ठांवर आवश्यक तो तपशील उदा. निवृत्तीचा दिनांक, अंशराशीकरणाचा दर व प्रदानाचा दिनांक, निवृत्ती वेतनाचा दर, कुटूंब निवृत्ती वेतनाचा दर, कुटूंब निवृत्ती वेतनात ज्या दिनांकापासून बदल करावयाचा आहे तो दिनांक व त्याचा दर इत्यादी तपशिल परिपूर्ण नमुद न केल्याने निवृत्ती वेतन, कुटूंब निवृत्ती वेतन योग्य दराने होत असल्याची खात्री लेखापरीक्षणात करता आलेली नाही.

२) लेखासंहिता परिशिष्ट क्रमांक “४” च्या ७७ नुसार दरवर्षी निवृत्ती / कुटूंब निवृत्ती वेतन धारकांकडून हयातीचे दाखले प्राप्त करुन घेऊनच नंतरचे निवृत्ती वेतन प्रदान करणे आवश्यक असतांना अशा प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे सर्व हयात असलेल्या निवृत्ती वेतन धारकांनाच निवृत्ती वेतन प्रदान झाल्याची खात्री लेखापरीक्षणात करता आलेली नाही.

३)  लेखासंहीता परिशिष्ट क्रमांक ४ च्या नियम ८० नुसार ज्यांची निवृत्ती वेतने त्यांच्या विवाहानंतर किंवा पुनर्विवाहानंतर बंद होण्याजोगी असतील अशा स्त्री निवृत्ती वेतन धारकांच्या बाबतीत नमुना क्रमांक एपीपी १४ मधील प्रमाणपत्र दर सहा महिन्यांनी (डिसेंबर व जून) घेणे आवश्यक असतांना अशा प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

४)  एपीपी – ९ नोंदवहीत व पेन्शन प्रदान आदेशावर कोणतीही ओळखचिन्ह वा प्रतिसंदर्भ नमुद केलेला नसल्याने नोंदवहीतील नोंदींची तपासणी करण्यासाठी लेखापरीक्षण काळात वेळेचा अपव्यय झाला आहे. तरी सर्व पेन्शन प्रदान आदेशांवर एपीपी ९ नोंदवहीचा पृष्ठ क्रमांकाचा संदर्भ व एपीपी ९ नोंदवहीत पेन्शन प्रदान आदेशाचा संदर्भ क्रमांक ठळक अक्षरात नमुद करावा व पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे परिशिष्ट ४ नियम ९१ नुसार निवृत्ती वेतनाच्या चुकीच्या प्रदानास संवितरण अधिकारी व्यक्तीशः जबाबदार असल्याने उपरोक्त नमुद उणीवांची पुर्तता करुन होणारे निवृत्ती वेतन व कुटूंब निवृत्ती वेतन प्रदान योग्य दराने होत असल्याची खात्री करुन व तसे प्रमाणित करुन अनुपालन लेखापरीक्षणास दर्शवावे.

१९ निवृत्ती वेतन

---

**<u>परिच्छेद क्रमांक १८ :- निवृत्ती वेतन नोंदवहीतील अनियमितता (३ शिक्षण)</u>**

पंचायत समिती, बागलाण अंतर्गत गट शिक्षण विभागाकडील निवृत्ती वेतन प्रदान प्रकरणांची सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय नमुद करण्यांत येत आहे.

१)  महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे परिशिष्ट ४ – ६९ नुसार नमुना क्रमांक एपीपी – ९ ह्या नमुन्यात पेन्शन प्रदानाची नोंद ठेवणे आवश्यक आहे. पंचायत समिती बागलाण अंतर्गत सामान्य प्रशासन विभागाने विहीत नमुन्यातील एकूण २ भागात एकूण २१२ निवृत्ती, कुटूंबनिवृत्ती वेतन धारकांचा तपशील नोंदविला आहे.

सदर नोंदवहीतील डावीकडील पृष्ठांवर आवश्यक तो तपशील उदा. निवृत्तीचा दिनांक, अंशराशीकरणाचा दर व प्रदानाचा दिनांक, निवृत्ती वेतनाचा दर, कुटूंब निवृत्ती वेतनाचा दर, कुटूंब निवृत्ती वेतनात ज्या दिनांकापासून बदल करावयाचा आहे तो दिनांक व त्याचा दर इत्यादी तपशिल परिपूर्ण नमुद न केल्याने निवृत्ती वेतन, कुटूंब निवृत्ती वेतन योग्य दराने होत असल्याची खात्री लेखापरीक्षणात करता आलेली नाही.

२)  लेखासंहिता परिशिष्ट क्रमांक " ४ " च्या ७७ नुसार दरवर्षी निवृत्ती / कुटूंब निवृत्ती वेतन धारकांकडून हयातीचे दाखले प्राप्त करुन घेऊनच नंतरचे निवृत्ती वेतन प्रदान

करणे आवश्यक असतांना अशा प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे सर्व हयात असलेल्या निवृत्ती वेतन धारकांनाच निवृत्ती वेतन प्रदान झाल्याची खात्री लेखापरीक्षणात करता आलेली नाही.

३) लेखासंहीता परिशिष्ट क्रमांक ४ च्या नियम ८० नुसार ज्यांची निवृत्ती वेतने त्यांच्या विवाहानंतर किंवा पुनर्विवाहानंतर बं होण्याजोगी असतील अशा स्त्री निवृत्ती वेतन धारकांच्या बाबतीत नमुना क्रमांक एपीपी १४ मधील प्रमाणपत्र दर सहा महिन्यांनी (डिसेंबर व जून) घेणे आवश्यक असतांना अशा प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

४) एपीपी – ९ नोंदवहीत व पेन्शन प्रदान आदेशावर कोणतीही ओळखचिन्ह वा प्रतिसंदर्भ नमुद केलेला नसल्याने नोंदवहीतील नोंदींची तपासणी करण्यासाठी लेखापरीक्षण काळात वेळेचा अपव्यय झाला आहे. तरी सर्व पेन्शन प्रदान आदेशांवर एपीपी ९ नोंदवहीचा पृष्ठ क्रमांकाचा संदर्भ व एपीपी ९ नोंदवहीत पेन्शन प्रदान आदेशाचा संदर्भ क्रमांक ठळक अक्षरात नमुद करावा व पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे परिशिष्ट ४ नियम ९१ नुसार निवृत्ती वेतनाच्या चुकीच्या प्रदानास संवितरण अधिकारी व्यक्तीश: जबाबदार असल्याने उपरोक्त नमुद उणीवांची पुर्तता करुन होणारे निवृत्ती वेतन व कुटूंब निवृत्ती वेतन प्रदान योग्य दराने होत असल्याची खात्री करुन व तसे प्रमाणित करुन अनुपालन लेखापरीक्षणास दर्शवावे.

निवृत्ती वेतन<br>
३ शिक्षण

---

**परिच्छेद क्रमांक १९ :- संबंधितांना लिहिलेले धनादेश प्रदान न केलेबाबत.**

पंचायत समिती, बागलाणकडील जिल्हानिधी योजनेच्या सन २००७ – २००८ मधील रोखवही व धनादेश पुस्तक यांची पडताळणी केली असता खालील दर्शविलेले धनादेश अद्यापपर्यंत संबंधितांना प्रदान करणेत आलेले नाहीत, असे आढळून आले.

**जिल्हा निधी**

| नाव | धनादेश क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| श्रीमती. सिंधु रमेश मोरे | ९५५७११ | ३१.३.२००८ | १,६७६ |

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम २७ अन्वये लागलीच आवश्यकता असलेशिवाय खर्च करण्यास अनुमती नाही. असे

असतांना गटविकास अधिकारी, पंचायत समिती बागलाण यांनी केवळ त्या-त्या लेखाशिर्षाखालील अनुदान व्यपगत होऊ नये म्हणुन आवश्यकता नसतांनाच दिर्घदिन खर्च नोंदविलेला आहे. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे क्षमापन घेऊन पुर्तता दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक २० :- अनामत सदरी तीन वर्षापेक्षा जास्त काळ जमा असलेल्या रक्कमा व्यपगत करणेबाबत.**

पंचायत समिती बागलाण यांचेकडील सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षणाचे वेळी अनामत नोंदवही पडताळली असता दिनांक ३१.३.२००८ अखेर रुपये ५६,२६,०९९/- इतकी रक्कम शिलल्क असून या अहवालासोबत जोडण्यात आलेल्या विवरणपत्र क्रमांक “ ३ ब ” नुसार सदर रक्कमेत सन २००४ – २००५ या वर्षातील रुपये ४८,४२४/- इतकी रक्कम समाविष्ठ आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम २०९(७) अन्वये अनामत सदरी ३ वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी जमा असणा-या रक्कमा व्यपगत करुन समितीच्या लेख्यात जमा करणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही झालेली नाही. तरी सदर सन २००४ – २००५ ची रक्कम रुपये ४८,४२४/- व्यपगत करुन लेखापरीक्षणांस अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २१ :- जामीनदार हयात व लायक असलेचे दाखले न घेतलेबाबत...**

पंचायत समिती, बागलाणचे सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षण केले असता काही कर्मचा-यांचे जामीनदार हयात व लायक असलेचे दाखले दप्तरी नाहीत. त्याबाबतचा तपशील सोबतच्या परिशिष्ट क्रमांक “ ह ” मध्ये देण्यात आला आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ४३ (३) अन्वये प्रत्येक वित्तीय वर्षाचे सुरुवातीस जामीनदार हयात व लायक असल्याचे दाखले घेणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त नमुद केलेल्या कर्मचा-यांचे जामीनदार हयात व लायक असल्याचे दाखले घेणेत आलेले नाहीत. तरी उपरोक्त नियमाप्रमाणे कार्यवाही करुन अनुपालन लेखापरीक्षणांस दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २२ :- बांधकाम उपविभाग बागलाण यांचेकडील नमुना नंबर ३९, ४० व ४१ नोंदवह्यांबाबत.**

१) बांधकाम उपविभागाकडील नमुना नंबर ३९ नोंदवही पहाता सन २००७ – २००८ पर्यंत घसारा रक्कम नमुद केलेली असून त्यावर सक्षम अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली नाही.

२) नमुना नं.४० मध्ये रकाना क्रमांक ८ मध्ये काम पूर्णत्वाचा दिनांक नमूद नाही, रकाना क्र.९ मध्ये प्रत्येक मैलास सरासरी खर्च नमूद नाही, तर रकाना क्र. १० मध्ये प्रत्येक किलो मीटरला दुरुस्तीसाठी किती खर्च झाला, याबाबत माहिती भरलेली नाही.

३) नमुना नं. ४१ नोंदवहीत रिकाम्या जागेच्या ठिकाणी ७/१२ उतारे प्राप्त करुन त्या जागेवर अतिक्रमण झालेले नसल्याचे उपअभियंता, बांधकाम विभाग यांनी प्रमाणित केलेले नाही.

उपरोक्त उणिवांची पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणास दर्शवावे. वरील अपूर्णतेबाबत लेखापरीक्षण अहवाल सन २००६ – २००७ मध्ये आक्षेप क्रमांक ३० नोंदविण्यात आला असतांनाही कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, ही बाब खेदजनक आहे.

बांधकाम उपविभाग, बागलाण पंचायत समिती

---

**परिच्छेद क्रमांक २३ :- लघुपाटबंधारे उपविभाग बागलाण यांचेकडील नमुना नंबर ३९ व ४१ नोंदवहीबाबत.**

उपरोक्त विभागाकडील नमुना नंबर ३९ व ४१ नोंदवह्यांचे लेखापरीक्षण केले असत त्यासंदर्भात खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहे.

१) नमुना नंबर ३९ नोंदवहीत दरवर्षी घसारा रक्कम परिगणित करुन मालमत्तेची पुस्तकी किंमत नमुद करणे आवश्यक असतांना सन २००४ ची घसारा रक्कम परिगणित केल्याची नोंद घेण्यात आलेली आहे. सन २००५ पासून कोणत्याही मालमत्तेची घसारा रक्कम परिगणित केलेली नसून पुस्तकी किंमत नमुद केलेली नाही.

२) नमुना नंबर ४१ नोंदवहीची पडताळणी केली असता सदर नोंदवहीत नमुद पाझरतलावांच्या संपादित / प्राप्त जमिनीचे ७/१२ उतारे उपलब्ध करुन त्या जिल्हा परिषदेच्या मालकीच्या झाल्या असल्याबाबत उपअभियंता लघुपाटबंधारे उपविभाग, बागलाण यांनी प्रमाणित केलेल्या नाहीत. वरील अपूर्णतेबाबत सन २००६ – २००७ च्या लेखपरीक्षण अहवालात आक्षेप क्रमांक ३१ नोंदविण्यात आलेला असतांनाही कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

उपरोक्त नोंदवह्या अद्ययावत करुन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २४ :- संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेतून धान्य वाटप कुपनांबाबत.**

सन २००७ – २००८ वर्षाअखेर पंचायत समिती बागलाण अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर वाटप केलेले धान्य कुपन व ग्रामपंचायतीने झालेल्या खर्चाचे प्रमाणात वाटप मजूरी व धान्य कुपन याचा हिशोबाचा तपशिल अर्धसमास पत्र क्रमांक ६ दिनांक २९.८.२००८ अन्वये मागविण्यात आला असता, सोबत जोडलेले परिशिष्ट क्रमांक " ग " नुसार धान्य कुपन पंचायत समिती स्तरावरुन वाटप करण्यात आलेले असल्याचे खुलाशात नमुद करण्यात आले आहे. तथापि वाटपाचा हिशोब संबंधित ग्रामपंचायतीकडून प्राप्त झालेला नाही.

उपलेखापाल (संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना) यांनी ग्रामपंचायतीचे (संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना) नियमित तपासणी न करणे ही गंभीर बाब असून पर्यवेक्षणाचा अभाव दर्शविणारी आहे व उपलेखापालाचे कामकाजावर पर्यवेक्षकीय नियंत्रण नसल्याचे स्पष्ट होते. तरी उपलेखापाल यांनी ग्रामपंचायत दप्तराची तपासणी करुन खर्चाचे प्रमाणात वाटप धान्य कुपन व मजुरी यांचा मेळ घेऊन अनुपालन लेखापरीक्षणात सादर करण्यात यावे.

---

**परिच्छेद क्रमांक २५ :- लघुपाटबंधारे उपविभाग यांचेकडील विनावापर पडून असलेल्या यंत्रसामुग्री व हत्यारे फर्निचर साहित्याबाबत.**

या अहवालासोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट क्रमांक "च" (अ व ब) मध्ये नमुद केल्याप्रमाणे उपअभियंता (लघुपाटबंधारे) उपविभाग बागलाण यांचेकडे १ जीप वाहन, लाकडी व लोखंडी फर्निचर तसेच बांधकाम हत्यारे विनावापर पडून आहेत.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय नमुद करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजना विभाग, शासन निर्णय क्रमांक आय.टी.आय. ३०९४/४०७४/व्यशि-१/दिनांक ४.२.१९९५ नुसार कार्यालयामध्ये ज्या नियमित वापराच्या दृष्टीने अयोग्य अशा वस्तू निर्लेखित केल्या जातात, त्या वस्तू लिलावाद्धारे विकून टाकण्याऐवजी राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण / तंत्रशिक्षण माध्यमिक शाळा, तंत्रनिकेतन, अभियांत्रिकी महाविद्यालये यांना सदर शासन निर्णयात नमुद कार्यपध्दतीचा अवलंब करुन कोणतेही मुल्य प्रत्यक्ष न आकारता हस्तांतरीत कराव्यात असे निर्देश देण्यात आलेले आहेत.

उपरोक्त शासन निर्णयानुसार योग्य ती कार्यवाही करुन हस्तांतरीत कराव्यात.

वरीलप्रमाणे हस्तांतरीत वस्तु व्यतिरिक्त वस्तुंबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील पत्र क्रमांक मुख्य अभियंता (या) भूसविय/

तांत्रिक १/नस्ती/१७/०८ दिनांक २.१.२००८ नुसर कार्यवाही करुन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक २६ :- रिक्त शासकीय निवासस्थानांबाबत.**

अर्धसमास पत्र क्रमांक ७ दिनांक २९.८.२००८ अन्वये पंचायत समिती बागलाण यांचेकडील रिक्त निवासस्थांनाबाबत माहिती मागविण्यात आली होती. त्यानुसार उपलब्ध करुन दिलेल्या अभिलेख्यांचे लेखापरीक्षण करता पंचायत समिती बागलाण यांचेकडे एकूण ९ निवासस्थाने असून त्यांपैकी १ निवासस्थान (चटई क्षेत्र ४९२ चौ. फुट) हे दिनांक १५.६.२००७ पासून रिक्त आहे. तसेच सदरचे निवासस्थान वापराबाबत योग्य नसल्याचे नमुद करण्यात आलेले आहे.

तरी संबंधित बांधकाम उपविभागाने सदर विनावापर दुरुस्तीबाबत योग्य निर्णय घेऊन उचित कार्यवाहीसह पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक २७ :- वेतनपटावर मुद्रांकीत पोहच न घेतल्याबाबत.**

पंचायत समिती बागलाण यांचेकडील सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षातील वेतनदेयकांची पडताळणी केली असता वेतनदेयकांवर दरमहा संबंधित कर्मचा-यांची मुद्रांकीत पोहोच घेण्यात आलेली नाही.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक डी.डी.ओ.१००५/ प्र.क्र.५/कोषा/प्रशा-५/ दिनांक २९.८.२००५ नुसार वेतनपटावर मुद्रांकीत पोहोच घेणे आवश्यक आहे.

तरी सर्व कर्मचा-यांची प्रत्येक महिन्याच्या देयकांवर स्वाक्षरी घेऊन आवश्यक तेथे मुद्रांकीत स्वाक्षरी घेऊन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक २८ :- विज देयकातील विज शुल्क प्रदानांबाबत.**

पंचायत समिती, बागलाण यांनी प्रमाणक क्रमांक ६२ दिनांक १४.९.२००७ अन्वये रक्कम रुपये ४,२३०/- प्राथमिक आरोग्य केंद्र, ब्राम्हणगांव यांचेकडील विज देयकांची खर्च नोंदविला आहे. सदर विज देयकात रुपये ४७५/- इतकी विज शुल्काची आकारणी केलेली आहे.

महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम १९६५ चा नियम १४७ ची टिप – ३ नुसार शासकीय कार्यालयाने प्रत्येक विज आकारणी देयक प्रदान करतांना सदर देयकात विज शुल्काचा समावेश करण्यात आलेला नसल्याचे प्रमाणपत्र नमुद करणे आवश्यक

असतांना उपरोक्त देयकात विज शुल्काची आकारणी केलेली असतांनाही संपूर्ण विज मागणी देयकानुसार रक्कम प्रदान केलेली आहे.

उपरोक्त प्रमाणे प्रतिमहा सरासरी रुपये ४७५/- प्रमाणे वर्षभरात अंदाजे रुपये ५,०००/- चे वर तसेच विज जोडणी घेतल्या कालावधीपासून फार मोठ्या प्रमाणात रक्कम विज शुल्कापोटी विद्युत मंडळास विनाकारण प्रदान केलेली आहे.

तरी पंचायत समिती, बागलाण यांनी सर्व विज देयकांची पडताळणी करुन ज्या देयकात विद्युत मंडळ विज शुल्काची आकारणी करत असेल त्या सर्व बाबत लेखी तक्रार नोंदवून विज शुल्क माफी प्राप्त करुन घ्यावी तसे अनुपालन लेखापरीक्षणास दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २९ :- बाहयरुग्ण फी उशिरा भरणा केलेबाबत.**

पंचायत समिती, बागलाणअधिनस्त प्राथमिक आरोग्य केंद्रांकडील खालील दर्शविलेल्या रोकडवह्यांची तपासणी केली असता बाहय रुग्ण फी खालीलप्रमाणे विलंबाने भरणा केल्याचे आढळले.

| बाहयरुग्ण फी जमा केल्याचा कालावधी | रक्कम रु. | भरणा केलेला दिनांक |
|---|---|---|
| **१) प्राथमिक आरोग्य केंद्र, मुल्हेर** | | |
| ०१.०८.२००७ ते ३१.०८.२००७ | १०६८ | १३.०९.२००७ |
| १७.०९.२००७ ते १३.१०.२००७ | १४९० | १६.१०.२००७ |
| **२) प्राथमिक आरोग्य केंद्र, निरपुर** | | |
| ०१.०९.२००७ ते १५.०९.२००७ | ३७८ | १८.०९.२००७ |
| **३) प्राथमिक आरोग्य केंद्र, साल्हेर** | | |
| २७.०८.२००७ ते २१.०९.२००७ | ६४४ | २४.०९.२००७ |
| **४) प्राथमिक आरोग्य केंद्र, जायखेडा** | | |
| ०१.०९.२००७ ते १७.०९.२००७ | १४७६ | १८.०९.२००७ |
| **५) प्राथमिक आरोग्य केंद्र, ताहाराबाद** | | |
| ०३.०८.२००७ ते २८.०८.२००७ | २९७४ | ०३.०९.२००७ |
| २९.०८.२००७ ते २४.०९.२००७ | २६८० | ०३.१०.२००७ |
| **६) प्राथमिक आरोग्य केंद्र, ब्राम्हणगांव** | | |
| ०५.०७.२००७ ते ३१.०८.२००७ | ४७९२ | ०४.०९.२००७ |
| ०१.०९.२००७ ते २२.०९.२००७ | १६६० | २४.०९.२००७ |
| २३.०९.२००७ ते १७.१०.२००७ | १७०८ | १८.१०.२००७ |

महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती लेखासंहीता, १९६८ चे नियम १३ अन्वये वसुल केलेली रक्कम दररोज जमा करणे आवश्यक आहे. नियम क्रमांक ४९ अन्वये उशिरात उशिरा १५ दिवसात रक्कमेचा भरणा करणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही केलेली नाही. बाहयरुग्ण फी जास्त दिवस हातात ठेवणे ही बाब नियमबाहय असून उशिरा भरणा केलेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे क्षमापन घेऊन पुर्तता दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक ३० :- वार्षिक लेखे.**

लेखापरीक्षण अहवालातील आक्षेपांचे संपूर्ण अनुपालनास अधिन राहुन व निवडक महिन्यांशिवाय इतर महिन्यांतील लेख्यांमध्ये कुठलीही गंभीर अनियमितता अंतर्गत लेखापरीक्षण विभागाने निदर्शनास आणलेली नाही, या आधारे सन २००६-०७ चे वार्षिक लेखे बरोबर असल्याचे प्रमाणित करणेत येत आहे.

---

**परिच्छेद क्रमांक ३१ :- अनुपालन व पोहोच.**

मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० चे कलम १०(१) अन्वये या लेखा परीक्षण अहवालातील आक्षेपांवरील अनुपालन, प्रस्तुत अहवाल प्राप्त झाले पासुन चार महिन्याच्या आत, पंचायत समितीच्या ठरावासह व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे स्वाक्षरीने तीन प्रतीत या कार्यालयाकडे पाठविणेत यावे. तसेच हा अहवाल प्राप्त झाल्याचा दिनांक कळवुन पोहोच देणेत यावी.

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक

**प्रत सविनय सादर**

१) मा. सचिव, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ( पत्राने )
२) मा. महालेखापाल, बाहय लेखा परीक्षण विभाग, मुंबई
३) मा. आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक
४) मा. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
५) मा. उपमुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, नाशिक विभाग, नाशिक .

**प्रत सस्नेह अग्रेषित :-**

१) म. उपमुख्य लेखा परीक्षक (पंचायत राज समिती), स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
२) म. गटविकास अधिकारी, पंचायत समिती बागलाण.

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक